वृक्षलागवडीच्या अनुभवांवरील पुस्तकाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

■ मुंबई

वृक्षलागवड ही आवड किंवा छंद म्हणून नव्हे तर गरज म्हणून हवी असे सांगताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यात वृक्ष लागवडीची मोठी मोहीम सुरू करण्याचे सूतोवाच केले.

काल सायंकाळी ते वर्षा येथील समिती कक्षात मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खाग्रे यांनी लिहिलेल्या एक हरित चळवळ, वृक्षलागवडीचा महाप्रयोग या पुस्ताकाचे प्रकाशन करताना बोलत होते.

पर्यावरण रक्षणाला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून त्यामुळेच आपण आरेचे ८०० एकरचे जंगल जपण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. वाढत्या जागतिक तापमानाला रोखण्यासाठी आणि प्रदुषण कमी करण्यासाठी ज्या उपाययोजना आहेत त्यात वृक्षलागवड हा महत्वाचा विषय असून तो केवळ आवडीचा नाही तर गरजेचा विषय झाला आहे. या वाटेवरून पुढे जातांना हे पुस्तक हरित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. या प्रकाशनासाठी खासदार विनायक राऊत, मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिष सिंग, मुख्यमंत्र्यांचे सचिव आबासाहेब जराड, श्री. खाग्रे यांच्या पत्नी श्रीमती मिनाक्षी खाग्रे, व्यंकटेश आणि मनिष खाग्रे, वन विभागातील अधिकारी अरविंद आपटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले की, कोरोनाने आपल्याला त्याचे परिणाम-दुष्परिणाम दाखवले पण काही चांगल्या गोष्टी ही दाखवल्या. या काळात प्रदुषण कमी झाल्याने मोर रस्त्यावर नाचल्याचे आपण सर्वांनी पाहिले. त्यामुळे प्रत्येकाने प्रदुषण कमी करण्यासाठी जे जे काही करता येईल ते करणे गरजेचे आहे. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबवण्याचा प्रयत्न करतांना वनवैभव जपायचे आणि वाढवायचे आहे. जिथे आपण झाड लावू शकतो म्हणजे जिथे जागा आणि पाणी आहे तिथे वृक्षलागवड झाली पाहिजे, पाण्याच्या टाक्या करून डोंगर उतारावर पळस- पंगारा सारखी नयनमनोहारी झाडे लावून एक सुंदर व्हॅली निर्माण केली पाहिजे. यासाठी डोंगरावर जलसंधारणाची कामे हाती घेणे,वृक्षलागवडीची मोहिम जोमाने पुढे नेण्याची गरज आहे असे झाले तर डोंगरावर हिरवा शालू आपण निर्माण करू शकू असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विकास खाग्रे यांनी ते वन विभागात प्रधान सचिव म्हणून कार्यरत असतांना करण्यात आलेल्या महावृक्षलागवडीचा अनुभव आणि हे पुस्तक लिहिण्यामागची आपली भूमिका विशद केली. ते म्हणाले की राज्याचे सध्याचे वनक्षेत्र २० टक्के आहे ते ३३ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी अंदाजे ४०० कोटी वृक्ष लावणे आणि ते जगवणे आवश्यक आहे. एकट्या वन विभागाकडून हे काम होणे शक्य नसल्याने व्यापक लोकसहभाग मिळवत वन विभागाने वृक्षलागवडीचा महाप्रयोग हाती घेतला होता. यात पारदर्शकता जपतांना विविध प्रोत्साहनात्मक योजना राबविण्यात आल्याचेही ते म्हणाले. वन विभागाने ६५ लाखांची हरित सेना निर्माण केली. कन्या वन समद्धी योजनेतून मुलीच्या जन्माचे स्वागत करतांना १० वृक्ष लावण्याचा संस्कार रुजवला. रानमळा पॅटर्नमधून जन्मवृक्ष, शुभमंगल वृक्ष,स्मृती वृक्ष अशा पद्धतीने जीवनातील प्रत्येक सुखदु:खाचा प्रसंग आणि त्या आठवणी वृक्ष लावून जपण्याचे आवाहन करण्यात आले. यात राज्य आणि केंद्र शासनाचे विविध विभाग,सामाजिक, स्वंयसेवी,अध्यात्मिक संस्था,सिनेक्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, प्रसार माध्यमे, लोकप्रतिनिधी अशा सर्वांचा सहभाग होता. काटेकोर नियोजन, पुर्वतयारी करत हरित महाराष्ट्राची ही चळवळ लोकचळवळीत रुपांतरीत करण्यात यश मिळाल्याचे व भारतीय वन सर्वेक्षण अहवालातून या वृक्षलागवडीच्या फलनिष्पत्तीचे निष्कर्ष दिसून आल्याचेही ते म्हणाले.

पालखी मार्गांची कामे ३१ मार्च अखेर पूर्ण करा

पुणे- संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गांची कामे ३१ मार्चअखेर पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. पुणे येथील 'व्हीव्हीआयपी' सर्किट हाऊस येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली 'संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या कामासंदर्भात आढावा बैठक झाली.

यावेळी विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, सातारा जिल्हाधिकारी शेखर सिंह (व्हिसीव्दारे), सोलापूर जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर (व्हिसीव्दारे), जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, अधीक्षक अभियंता अतुल चव्हाण तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव तसेच पुणे, सोलापूर आणि सातारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या दोन्ही मार्गांची काम ३१ मार्चपर्यंत पूर्ण होतील, असे नियोजन करावे. एखादा प्रकल्प काही कारणांमुळे लांबला तर खर्चात वाढ होते. या दोन्ही मार्गांचे भूसंपादन आणि मावेजा वाटप करण्यात यावे. आवश्यकता भासल्यास विभागीय आयुक्त राव यांनी वेगळी बैठक घेऊन विषय मार्गी लावावा, असे आदेशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिले.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र. झोपुप्रा/जनिपुउ/कावि-/DYCOLOW/२०२१/३०१७ दिनांक २१/०१/२०२१

अधिसूचना

उपाआयुक्त, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ब च्या पोटकलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करून दि. १ एप्रिल, १९९८ रोजी राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

उपाआयुक्त, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम २ क उप-कलम (१) अनुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत;

त्याअर्थी उक्त कलम ३ (क) चे उपकलम (१) मधील शक्तीचा वापर करून मी, खालील प्रमाणे अनुसूचीमध्ये दर्शविलेले क्षेत्र 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून याद्वारे घोषित करीत आहे. सदरचे क्षेत्र बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली २०३४ चे नियम ३३ (१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करण्यास पात्र आहे.

अनुसूची

अ. क्र.	गावाचे नाव	न.भु.क्र	मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.)	घोषित करावयाचे क्षेत्र (चौ.मी.)	चतुर्ट : सिमा			
					पुर्वेस	पश्चिमेस	दक्षिणेस	उत्तरेस
१		३४	१२४८.३	१२४८.३	न.भू.क्र. ३६	रस्ता	न.भू.क्र. ३९	न.भू.क्र. १६७ व १९९
२		३५	९९.२	९९.२	न.भू.क्र. ३६	न.भू.क्र. ३६	न.भू.क्र. ३६	न.भू.क्र. ३६ व १६७
३		३६	११९८.०	११९८.०	न.भू.क्र. ३८	न.भू.क्र. ३८	न.भू.क्र. ३४	न.भू.क्र. ३५, ३७, १६७
४		३७	२६.९	२६.९	न.भू.क्र. ३८	न.भू.क्र. ३६	न.भू.क्र. ३६	न.भू.क्र. १६६
५		३८	५४१.२	५४१.२	न.भू.क्र. ४८/१	न.भू.क्र. ३६, ३७	न.भू.क्र. ३९	न.भू.क्र. ७५ व १६६
६		३९	२१६७.९	२१६७.९	न.भू.क्र. ४७ व ४८	रस्ता	न.भू.क्र. ४०	न.भू.क्र. ३४, ३६, ३८
७	गौवे-भोईली, ता. कुर्ला	४०	१२१२.५	१२१२.५	न.भू.क्र. ४१, ४६	रस्ता	रस्ता	न.भू.क्र. ३९
८		४१	१६२८.९	१६२८.९	न.भू.क्र. ४२, ४५	न.भू.क्र. ४० व रस्ता	रस्ता	न.भू.क्र. ४६
९		४६	१०१९.५	१०१९.५	न.भू.क्र. ४५/१	न.भू.क्र. ४०	न.भू.क्र. ४१	न.भू.क्र. ४७
१०		४६/१	११७६.९	११७६.९	न.भू.क्र. ४८	न.भू.क्र. ४६	न.भू.क्र. ४५	न.भू.क्र. ४८
११		४७	१३४.२	१३४.२	न.भू.क्र. ४८	न.भू.क्र. ३९	न.भू.क्र. ४६	न.भू.क्र. ४८
१२		४८	८०७२.४	८०७२.४	न.भू.क्र. ४९, ५६ व ६०	न.भू.क्र. ३८, ३९, ४७, ४६, ४८/१	न.भू.क्र. ४४, ४६/१	न.भू.क्र. ७५, ७६, १५६
१३		४८/१	६१.९	६१.९	न.भू.क्र. ४८	न.भू.क्र. ३८	न.भू.क्र. ४७, ४८	न.भू.क्र. ४८
१४		५५	६८४.५	६८४.५	न.भू.क्र. ५१	न.भू.क्र. ५६	न.भू.क्र. ५४	न.भू.क्र. ५०
१५		५६	१३७५.३	१३७५.३	न.भू.क्र. ५४, ५५, ५७, ५८	न.भू.क्र. ४८	न.भू.क्र. ६०	न.भू.क्र. ४९
	एकुण		२१३६७.६	२१३६७.६				

(सतिश लोखंडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रे (पूर्व), ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. २६१६५००० / २६१९०४०५ / ५८७१ फॅक्स क्र. ९१-२२-२६१९०४१७ संकेतस्थळ : info@sra.gov.in

रविवारी मध्य रेल्वे मार्गावर मेगा ब्लॉक

मुंबई- मध्य रेल्वे ता. २४.१.२०२१ रोजी देखभाल कार्य करण्यासाठी आपल्या उपनगरी भागांवर मेगा ब्लॉक चालविणार आहे. माटुंगा-मुलुंड अप व डाऊन जलद मार्गावर सकाळी ११.०० ते संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी १०.२५ ते दुपारी ३.२१ पर्यंत सुटणाऱ्या डाउन जलद मार्गावरील सेवा माटुंगा येथे डाउन धिम्या मार्गावर वळविण्यात येतील आणि शीव ते मुलुंड दरम्यान सर्व स्थानकांवर थांबतील. या गाड्या नियोजित वेळापत्रकानंतर १५ मिनिटांनी गंतव्यस्थानी पोहोचतील. ठाण्यानंतर निर्धारित मार्गावर चालविण्यासाठी जलद सेवा मुलुंड येथे डाऊन जलद मार्गावर वळविण्यात येतील. ठाणे येथून सकाळी १०.४६ ते दुपारी ३.२६ या वेळेत सुटणा-या अप जलद मार्गावरील सेवा मुलुंड येथे अप धिम्या मार्गावर वळविण्यात येतील आणि मुलुंड ते दादर दरम्यान सर्व स्थानकांवर थांबतील. या सेवा नियोजित वेळापत्रकापेक्षा १५ मिनिटांनंतर गंतव्यस्थानी पोहोचतील. दादरच्या पलीकडे जलद सेवा परळ येथे अप जलद मार्गावर वळविण्यात येतील.

माथाडी नेते राजाराम मुटल यांच्या कामगार संघटनेच्या मागणीला यश

■ मुंबई

माथाडी कामगार नेते राजाराम मुटल यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र राज्य माथाडी आणि गुमास्ता जनरल कामगार संघटनेच्या मागणीची थेट राज्याच्या वित्त विभागाने दखल घेत त्यांच्या मागणीसंदर्भात कार्यवाही करण्याचे उद्योग व कामगार विभागाच्या कक्ष अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.

या माथाडी कामगार संघटनेने आपल्या कामगारांच्या मागणीसाठी सरकारी कामगार अधिकारी व सचिव मालवाहतूक कामगार मंडळ मुंबईचे हरीष पुरी यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता. मात्र याबाबत कोणतीही दखल घेतली जात नसल्याने संघटनेचे सरचिटणीस राजाराम मुटल यांनी थेट वित्त विभागाकडे पाठपुरावा सुरू केला. त्यानंतर वित्त विभागाचे कक्ष अधिकारी संख्ये यांनी उद्योग व कामगार विभागाच्या कक्ष अधिकाऱ्यांना संबधित हरीष पुरी या सरकारी अधिकाऱ्याचे निवृत्तीवेतन थांबवून योग्य ती चौकशी करून संघटनेच्या मागणीबाबत योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश दिले आहेत.

कराड पालिकेच्या इतिहासात प्रथमच तीन दिवस विशेष सभा

■ कराड, प्रतिनिधी

कराड नगरपालिकेने विशेष सभेत असणाऱ्या १४८ विषयांवर सविस्तर चर्चा करत तीन दिवस विशेष सभा चालवण्याचा पालिकेच्या इतिहासात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.नगराध्यक्षा रोहिणी शिंदे यांच्या नावावर या विक्रमाची नोंद झाली असून भाजपने सूचना वाचण्यासाठी स्वत:कडेच ठेवल्याने नाराज झालेल्या विरोधी जनशक्तीने प्रत्येक सूचना वाचण्याचा आग्रह धरल्याने विशेष सभा विक्रमी वेळेकडे गेली. गुरूवारी दुपारी ३ वा.पासून रात्री ९ पर्यंत सहा तास सभा सुरू होती तर मंगळवारी चार तास झालेल्या सभेत अवघे ४१ विषयांवर चर्चा झाली,त्यानंतरचे विषय गुरूवारी घेण्यात आले तरीही केवळ १०६ व विषयांवर चर्चा झाल्याने या क्रमांकावर सभा थांबवण्यात आली आहे तर आता पुढील विषयांवर चर्चा करण्यासाठी आता सोम.२५ रोजी उर्वरीत सभा होणार आहे.

दरम्यान, पालिकेतील या सभेच्या फंड्याची गरमागरम चर्चा शहरात चांगलीच रंगू लागली आहे.आजच्या सभेत नागझरी नाल्यात मिसळणारे मैलापाणी आणि दत्त चौकातील मलनि:स्सारणाची हैंगिंग पाईप लाईन टाकण्याच्या विषयावरून जनशक्तीच्या नगरसेवकांनी पालिका प्रशासनावर जोरदार टीका केली.स्वच्छ सर्वेक्षणमध्ये देशपातळीवर कराड पालिकेचे नाव प्रथम क्रमांकावर येत आहे,ही भूषणावह बाब आहे.मात्र,नागझरी नाल्यात उघड्यावर सोडलेल्या मैलापाण्यामुळे स्वच्छ सर्वेक्षणाच्या कामाला अडथळा तर येत आहेच पण शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी कोणालाही खेळू देणार नाही, असा इशाराही यावेळी या नगरसेवकांनी दिला.

कोपरीत ब्रिज गर्डर लॉन्चिंगसाठी ट्रॅफिक ब्लॉक

■ मुंबई

मध्य रेल्वे दि. २३/२४.१.२०२१ (शनिवार / रविवारी रात्री) आणि दि. २४/२५.१.२०२१ (रविवार / सोमवार रात्री) रोजी कोपरी रोड ओव्हर ब्रिजच्या रोड क्रेनद्वारे गर्डरचे कार्य करण्यासाठी दोन ते मुलुंड स्थानकांदरम्यानच्या सर्व ६ मार्गावर विशेष ट्रॅफिक व पॉवर ब्लॉक चालविणार आहे. दोन्ही दिवशी मध्यरात्री ०१.०० ते ०४.३० या कालावधीत ब्लॉक चालविण्यात येईल.

मध्य रेल्वेकडून रोड क्रेनद्वारे शीव व आटगाव स्थानकांवर फूट ओव्हर ब्रिजसाठी गर्डर सुरू करण्यासाठी दोन शँडो ब्लॉक सुद्धा चालविण्यात येतील. शीव येथे चारही मार्गावर मध्यरात्री ००.४० ते पहाटे ०४.४० पर्यंत आणि अटगाव येथे डाउन मार्गावर सकाळी ०२.२० ते पहाटे ०६.२० या दरम्यान सदर ब्लॉक चालविण्यात येतील.

ई-दिवाण विजी यूझान
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड
हरला नाशती आणि दिवाणखोरी बोर्ड, २०१६ अन्वये कॉर्पोरेट दिवाणखोरी तराव प्रक्रिया (सीआयआरपी) लागू आहे
ई दिवाणखान दिनांक आणि वेळ: पेठबुधी १६, २०२१, डी. १२.०० वा.

अधिनियम आणि दिवाणखोरी मंडळ (कॉर्पोरेट दायित्वांविषयी दिवाणखोरी तराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ यात विनियम ३९ अन्वये प्रकाशित लागोपाठच्या जेट (इंडिया) लि. यांचा तराव व्यवस्थापकीय लिक्विडेटर म्हणजेच प्रकाशित लागोपाठ लिलाव https://eauction.auctiontiger.net यावरील "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "जेथे जे आहे" आणि "वांगणीच्या अवजारविक्रय तत्वावर" ई-दिवाणखाने खाली इच्छुक व्यक्ती/व्यवसायिकांना दि. १० पेठबुधी, २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी तराव कार्यवाहीचा तराव अधिकारी (ईओआर) म्हणविला आहेत.

लागवाणा यादि क्रमांक	तराव लागवाणा तपशील	लेखाचा (सी.जीएसटी लागू)	तराव	राखीव किंमत (अरबीय रु.)	कुशल रकम जमाच "ईएमडी" (अरबीय रु.)	बोली वेळवार वृद्धा (किमान) (अरबीय रु.)	ई लिलाव दिनांक आणि वेळ (ई. लिलाव अनमोदित विस्तारणासह)	ईएमडी तराव कारणाचा अंतिम दिनांक
१	घर क्र. ९७८/३१ आणि केंद्रीय दुकान क्र. ११४, राहिन जं. परिसर, वर्ली, नाथ दुकान, दिल्ली आणि दमण, दिव आणि दमण - ३९६२१०	५९	वाणिज्य जागा	२४,९२,०००	३,००,०००	५०,०००	२६ पेठबुधी, २०२१ रोजी ११.०० वाजेपर्यंत	२२ पेठबुधी, २०२१ रोजी, ५.०० वाजेपर्यंत
२	प्लॉट क्र. १५, सर्वे क्र. ३५२, मौजे नाथ पाडे, तालुका दुधाना, जिल्हा रायगड, महाराष्ट्र	३००	औद्योगिक जमीन	१,३७,०००	१००,०००	२५,०००	२६ पेठबुधी, २०२१ रोजी ११.०० वाजेपर्यंत	२२ पेठबुधी, २०२१ रोजी, ५.०० वाजेपर्यंत
३	प्लॉट क्र. ५३ या भाग, विकासात क्र. २३९, नाथ दरवाजा, नाशक पेठवाडा जमिनी, पुणे, महाराष्ट्र	१४०	औद्योगिक जमीन	७,११,०००	७०,०००	२१,०००	२६ पेठबुधी, २०२१ रोजी ११.०० वाजेपर्यंत	२२ पेठबुधी, २०२१ रोजी, ५.०० वाजेपर्यंत

ई-दिवाणखाने सुरक्षा आणि अटी खाली खालीलप्रमाणे:
१. ई-दिवाणखाने "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "जेथे जे आहे" आणि "वांगणीच्या अवजारविक्रय तत्वावर" संकेत लेख युजरनाव मे. ई-लीलाइनटेक्नोलॉजीस प्रा.लि.-जीसाम तराव वांगणीच्या वेबसाइट वेबसाइट.
२. अधिनियम दिवाण विक्रीचे तराव अधिकारी (ईओआर), अधिकृत ई-दिवाण बोली अर्ज, व्यक्तिजमा आणि इतर इच्छी अर्जदारांची संपूर्ण ई-दिवाण प्रक्रिया सामान्यने वेबसाईट https://eauction.auctiontiger.net या ठिकाणे आहेत. संपर्क श्री. राज ९८७३३७४८४.
३. इच्छुक बोलीदारांनी त्यांचे बोली तराव कागदपत्रे, मालमत्ता/मिळकतीचे तपशील, एकत्रित कागदी ठेवी, तीन आणि पाणी युक्ती, देखभाल युक्ती, जर अस्तित्वात असल्यास स्थानिक पौरसंस्था करांची आणि मालमत्ता/मिळकतीची त्यांच्या तराव व्यवस्था करांची पावती करांची आणि तराव व्यवस्थेत सामान्य तपशील भरावे. या ठिकाणेच्या माध्यमातील संबंधित बोलीदारांनी पूर्ण पात्रतेचे जमेचा पावतीचे तपशील.
४. इच्छुक बोलीदारांनी त्यांचा तराव अधिकारी https://eauction.auctiontiger.net या तराव ई-दिवाण बोली व्यवस्थापनेच्या प्रणालीद्वारे आवश्यक कागदपत्रांसह दि. १० पेठबुधी, २०२१ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत तराव करावा. वरील संबंधित बोलीदारांचे इच्छुक तराव अवजार (ईएमडी) तराव जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडच्या एकाऊंटच, जोहरातील बचत, चालू टर्म डेपोजिट, बचत पोर्ट, महाराष्ट्र बोलवाणीने खाली क्र. ३५०२१३४४५५ आयएफएससी कोड क्र. एसबीआयएन०००४०१२ या चालू खात्यामध्ये टीडीएस/एईएमडी/आरटीजीएस किंवा ऑनलाईन एफटी द्वारे जमा करणे आवश्यक आहे. तीमाण पुरावा बोलवाणी तोडून बोलवाणे आणि सुरूवाती बोली देत आणावे.
५. बोलीदारांनी त्यांचा ईएमडी जमा केल्याचा पुरावा, ई-दिवाण बोली व्यवस्थापनाचा (व्यवस्थापने https://eauction.auctiontiger.net या) २२ पेठबुधी, २०२१ रोजी सायं. ५ वाजण्यापूर्वी (ईओआर) आणि इच्छीत जमा करावे लागेल किंवा पावतीचा जमा करावा.

ऱ्हाणे/-
अजिंक्य उपाध्याय
(IBBI/IPA-001/IP-P00294/2017-18/10536)
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड करिता तराव व्यवस्थापक
E.RP.JetAirways@in.gt.com
आणखीनजास्त माहिती ऑनलाईनसाठी:
जेट एअरवेज, ५० जी हॉस्पिटॉल स्ट्रीट, कोलकाता-७०००१५.
E.ashish.chhawchharia@in.gt.com

दिनांक: २३ जानेवारी, २०२१
ठिकाण: मुंबई

पश्चिम रेल्वे
३ विशेष गाड्या
चालविणार अहमदाबाद - पुणे व भूज - पुणे दरम्यान

गाडी क्र.	प्रारंभिक स्थानक व गंतव्य स्थानक	प्रारंभिक दिनांक	सेवांचे दिवस	प्रस्थान	आगमन
०१०४९	अहमदाबाद – पुणे	दि. २४.०१.२०२१ पासून	रविवार	२०.२० वा.	०७.४० वा. (दुसऱ्या दिवशी)
०१०५०	पुणे – अहमदाबाद	दि. २३.०१.२०२१ पासून	शनिवार	२०.१० वा.	०७.३० वा. (दुसऱ्या दिवशी)

थांबे : नाडियाद जं., आनंद जं., वडोदरा जं., भरूच जं., सुरत, नवसारी, वापी, वसई रोड, भिवंडी रोड, कल्याण जं. व लोणावळा स्टेशन – दोन्ही दिशांना.
गाडी क्र. ०१०५० ला ढहाणू रोड व वलसाड स्टेशन येथे अतिरिक्त थांबे असतील.
रचना : एसी २ टीयर, एसी ३ टीयर, शयनयान श्रेणी व द्वितीय श्रेणी आसनव्यवस्थेचे डबे

गाडी क्र.	प्रारंभिक स्थानक व गंतव्य स्थानक	प्रारंभिक दिनांक	सेवांचे दिवस	प्रस्थान	आगमन
०१०९५	अहमदाबाद – पुणे	दि. २८.०१.२०२१ पासून	गुरुवार	२०.२० वा.	०७.३५ वा. (दुसऱ्या दिवशी)
०१०९६	पुणे – अहमदाबाद	दि. २७.०१.२०२१ पासून	बुधवार	२०.१० वा.	०७.३० वा. (दुसऱ्या दिवशी)

थांबे : नाडियाद जं., आनंद जं., वडोदरा जं., भरूच जं., सुरत, नवसारी, वलसाड, वापी, ढहाणू रोड, वसई रोड, भिवंडी रोड, कल्याण जं., कर्जत व लोणावळा स्टेशन – दोन्ही दिशांना.
गाडी क्र. ०१०९५ ला शिवाजी नगर स्टेशन येथे अतिरिक्त थांबा असेल.
रचना : एसी २ टीयर, एसी ३ टीयर, शयनयान श्रेणी व द्वितीय श्रेणी आसनव्यवस्थेचे डबे

गाडी क्र.	प्रारंभिक स्थानक व गंतव्य स्थानक	प्रारंभिक दिनांक	सेवांचे दिवस	प्रस्थान	आगमन
०१९९१	भूज – पुणे	दि. २७.०१.२०२१ पासून	बुधवार	१३.२५ वा.	०७.३५ वा. (दुसऱ्या दिवशी)
०१९९२	पुणे – भूज	दि. २५.०१.२०२१ पासून	सोमवार	२०.१० वा.	१४.३० वा. (दुसऱ्या दिवशी)

थांबे : अंजार, अदीपूर जं., गांधीधाम जं., भचाऊ, सामाखियाली जं., ग्रांगध्रा, विरमगाम जं., अहमदाबाद जं., नाडियाद जं., आनंद जं., वडोदरा जं., भरूच जं., सुरत, नवसारी, वलसाड, वापी, वसई रोड, भिवंडी रोड, कल्याण जं., कर्जत व लोणावळा स्टेशन- दोन्ही दिशांना.
गाडी क्र. ०१९९१ ला शिवाजी नगर स्टेशन येथे व गाडी क्र. ०१९९२ ला ढहाणू रोड व मणिनगर स्टेशन येथे अतिरिक्त थांबे असतील.
रचना : एसी २ टीयर, एसी ३ टीयर, शयनयान श्रेणी व द्वितीय श्रेणी आसनव्यवस्थेचे डबे

पश्चिम रेल्वे स्थानकांवरून जाणाऱ्या गाड्यांचा तपशील

गाडी क्र.	प्रारंभिक स्थानक व गंतव्य स्थानक	प्रारंभिक दिनांक	सेवांचे दिवस	प्रस्थान	आगमन
०१०८९	भगत की कोठी – पुणे	दि. २६.०१.२०२१ पासून	मंगळवार	१२.१५ वा.	०७.३५ वा. (दुसऱ्या दिवशी)
०१०९०	पुणे – भगत की कोठी	दि. २४.०१.२०२१ पासून	रविवार	२०.१० वा.	१६.०० वा. (दुसऱ्या दिवशी)

थांबे : लुनी जं., पाली मारवाड, मारवाड जं., फालना, अबू रोड, पालनपूर जं., मेहसाणा जं., अहमदाबाद जं., नाडियाद जं., आनंद जं., वडोदरा जं., भरूच जं., सुरत, नवसारी, वलसाड, वापी, ढहाणू रोड, वसई रोड, भिवंडी रोड, कल्याण जं., कर्जत व लोणावळा स्टेशन- दोन्ही दिशांना.
गाडी क्र. ०१०८९ ला शिवाजी नगर स्टेशन येथे व गाडी क्र. ०१०९० ला मणिनगर स्टेशन येथे अतिरिक्त थांबे असतील.
रचना : एसी २ टीयर, एसी ३ टीयर, शयनयान श्रेणी व द्वितीय श्रेणी आसनव्यवस्थेचे डबे

थांब्यांसंदर्भातील विस्तृत वेळांकरिता कृपया www.enquiry.indianrail.gov.in येथे भेट द्यावी.
निश्चित तिकीट असलेल्या प्रवाशांनाच या विशेष गाड्यांमध्ये प्रवेश करता येईल.

प्रवाशांनी कृपया गाडीत प्रवेश करतेवेळी, प्रवास करतेवेळी व गंतव्य स्थानी पोहोचल्यावर कोविड – १९ ही संबंधित सर्व नियम, एसओपीज् यांचे पालन करावे.

गाडी क्र. ०१०४९ करितायची बुकिंग दि. २३ जानेवारी, २०२१ पासून आणि गाडी क्र. ०१०९५ व ०१९९१ करितायची बुकिंग दि. २५ जानेवारी, २०२१ पासून निर्दिष्ट पीआरएस काऊंटर्स व आयआरसीटीची वेबसाइटवर खुली होत आहे. वरील गाडी पूर्णतः आरक्षित गाडी म्हणून चालविण्यात येईल.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
अनुसरा लाइक करा facebook/WesternRly
आनुसरा फॉलो करा twitter/WesternRly

सर्व आरक्षित तिकिटांकरिता कृपया ओळखीचा पुरावा सोबत बाळगा.